नवनिर्मित स्त्री रुग्णालय, वाशिम येथील ४२ अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः पदआ - २०१९ /प्र.क्र.२०४/आरोग्य-३

१० वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.
तारीख: २४ जून,२०१९.

वाचा -

1. **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,क्रमांक -पदनि- २०१७/प्र.क्र.२३१/आरोग्य -३, दिनांक- १६.०२.२०१८.**
2. **आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- संआसे/कक्ष-३/टे-१२/नवनिर्मित स्त्री रुग्णालय, वाशिम/अपदे/सन १९-२०/८०७५-७६/१९, दिनांक-१७.०६.२०१९.**

शासन निर्णय-

उपरोक्त अ.क्र.१ येथील शासन निर्णयान्वये वाशिम येथे १०० खाटांचे स्त्री रुग्णालय स्थापन करण्यात आले आहे. तसेच अ.क्र.२ येथील शासन निर्णयान्वये सदर स्त्री रुग्णालयासाठी ४२ नियमित पदांची निर्मिती करण्यात आलेली आहे.

२. आता या शासन निर्णयान्वये सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार उप संचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला यांच्या अधिपत्याखाली स्त्री रुग्णालय,वाशिम येथील नव्याने निर्माण केलेल्या ४२ अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१९ ते ३०.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. सदर पदांवरील खर्च खालील लेखाशिर्षातून खर्ची घालण्यात यावा आणि हा खर्च सन २०१९-२०२० या वर्षाकरीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक-आर-१
२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०६ - पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना,
(०६)(०१) - मुसफल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये व दवाखाने (२२१० ०२२६)

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक,दिनांक- २१.०२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२४१३१२४२९७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2019.06.24 14:17:17 +05'30'

(रो.दि.कदम-पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई /नागपूर
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक,आरोग्य सेवा (रुग्णालये- राज्यस्तर), मुंबई.
५. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) पुणे.
६. उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला.
७. जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय, वाशिम.
८. वैद्यकीय अधिक्षक, स्त्री रुग्णालय, वाशिम.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, वाशिम.
१०. वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
११. कार्यासन अधिकारी, सेवा-२/सेवा-३/ सेवा-५/अर्थसंकल्प, सा.आ.वि. मंत्रालय,मुंबई.
१२. निवडनस्ती (आरोग्य-३)

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक-पदआ-२०१९/प्र.क्र.२०४ /आरोग्य-३,
दि.२४.०६.२०१९ अन्वये सोबतचे **विवरणपत्र**.

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	ग्रेड पे	एकूण निर्माण करावयाची पदे
१	वैद्यकीय अधिक्षक,गट-अ	१५६००-३९१००	६६००	१
२	वैद्यकीय अधिकारी (स्त्री रोग व प्रसुती तज्ञ) ,गट-अ	१५६००-३९१००	६६००	१
३	वैद्यकीय अधिकारी (बालरोग तज्ञ) ,गट-अ	१५६००-३९१००	६६००	१
४	वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण तज्ञ) ,गट-अ	१५६००-३९१००	६६००	१
५	वैद्यकीय अधिकारी (क्ष-किरण शास्त्रज्ञ) ,गट-अ	१५६००-३९१००	६६००	१
६	वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण शास्त्रज्ञ) ,गट-अ	१५६००-३९१००	५४००	२
७	वैद्यकीय अधिकारी (बालरोग तज्ञ) ,गट-अ	१५६००-३९१००	५४००	२
८	वैद्यकीय अधिकारी (स्त्री रोग प्रसुती तज्ञ) ,गट-अ	१५६००-३९१००	५४००	३
९	वैद्यकीय अधिकारी,गट-अ	१५६००-३९१००	५४००	५
१०	प्रशासकीय अधिकारी	९३००-३४८००	४४००	१
११	कार्यालयीन अधिक्षक	९३००-३४८००	४३००	१
१२	सहाय्यक अधिसेविका	९३००-३४८००	४४००	१
१३	परिसेविका	९३००-३४८००	४३००	५
१४	अधिपरिचारीका	९३००-३४८००	४२००	८
१५	बालरोग परिचारीका	९३००-३४८००	४३००	३
१६	रक्तपेढी तंत्रज्ञ	९३००-३४८००	४२००	१
१७	औषध निर्माण अधिकारी	५२००-२०२००	२८००	१
१८	वरिष्ठ लिपिक	५२००-२०२००	२४००	१
१९	कनिष्ठ लिपिक	५२००-२०२००	१९००	१
२०	वस्त्रपाल	५२००-२०२००	१९००	१
२१	व्रणोपचारक	५२००-२०२००	१८००	१
			एकूण	**४२**